दैनिक
अतुल्य महाराष्ट्र


मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | गुरुवार, 5 नोव्हेंबर 2026 | अंक क्र. 172 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

GVT व कन्हेरवाडी ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून ब्रह्मगंगा नदी खोलीकरणाचा भव्य शुभारंभ

राजेभाऊ फड यांच्या हस्ते उद्घाटन







■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

ग्लोबल विकास ट्रस्ट (GVT) आणि कन्हेरवाडी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त पुढाकारातून कन्हेरवाडी येथील ब्रह्मगंगा नदीच्या पुनरुज्जीवन, खोलीकरण व रुंदीकरण कामाचा भव्य शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कन्हेरवाडीचे राजेभाऊ फड यांच्या हस्ते सर्व मशिनरींचे पूजन करून उद्घाटनातून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली. या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे कन्हेरवाडी आणि परिसरातील पाण्याच्या गंभीर प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघणार असून, खऱ्या अर्थाने भागात जलक्रांतीची नवी दिशा मिळणार आहे.

■ पहिल्या टप्प्यात ५ किलोमीटरचे काम वर्षभर मुबलक पाणी मिळण्याचा विश्वास !

पहिल्या टप्प्यामध्ये कन्हेरवाडी शिवारातील ५ किलोमीटर अंतराचे नदी खोलीकरण आणि रुंदीकरण केले जाणार आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे लाखो लिटर पाणी या नदीपात्रात साचणार असून, त्याचा थेट फायदा शेतकरी, ग्रामस्थ आणि आजूबाजूच्या नागरिकांना होणार आहे. यामुळे शेतीला बारमाही पाणी उपलब्ध होऊन पिकांचे उत्पादन वाढण्यास मोठी मदत होणार आहे, असा विश्वास राजेभाऊ फड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

■ जलनायक मयंक गांधी यांच्या दूरदृष्टीचे कौतुक

ग्लोबल विकास ट्रस्टचे प्रणेते व जलनायक मयंक गांधी यांच्या दूरदृष्टिकोनातून राज्यात अनेक ठिकाणी वृक्षारोपण, जलसंधारण आणि शेतकरी कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. या समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत, नैसर्गिक दुष्काळी संकटावर मात करण्यासाठी त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे, असे राजेभाऊ फड यांनी नमूद केले. तसेच इतर भागातील नागरिकांनीही मयंक गांधी यांच्या या आदर्श मॉडेलची मदत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

■ २६ बोअरवेल रिचार्ज (शाफ्ट) ठरणार जलक्रांतीचा पाया

नदीच्या पात्रात बोअरवेल घेऊन त्याच्या भोवती विशेष गाळणी (Filtration System) तयार केली जाईल. यामुळे माती किंवा गाळ न जाता केवळ स्वच्छ पाणी जमिनीच्या भूगर्भात मुरेल. या तंत्रज्ञानामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने वाढेल आणि उन्हाळ्यातही परिसरातील विहिरी व कूपनलिकेमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध राहील.

■ ग्रामस्थांचा लोकवर्गणीचा भार '१५ व्या वित्त आयोगातून' भरणार ! राजेभाऊ फड

जलसंधारणाच्या कामांसाठी सहसा ग्रामस्थांकडून लोकवर्गणी गोळा करावी लागते. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन राजेभाऊ फड यांनी मोठा निर्णय घेतला आहे. गावकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार न टाकता, ग्रामस्थांचा लोकवाटा ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून भरला जाईल, असे स्पष्ट करून त्यांनी ग्रामस्थांना मोठा दिलासा दिला.

या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी परिसरातील विविध मान्यवर, ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. GVT च्या या उपक्रमाबद्दल संपूर्ण कन्हेरवाडी ग्रामस्थांनी अत्यंत उत्स्फूर्त प्रतिक्रिया देत जलनायक मयंक गांधी आणि प्रशासनाचे मनापासून आभार मानले.



परळीच्या जनता दरबारात ना . पंकजाताई मुंडेंना चिमुकल्याचा निरागस नमस्कार ; पंकजाताईंनी काम थांबवून साधला संवाद

चॉकलेट देत केले कौतुक; काही क्षणांच्या भावनिक प्रसंगाने उपस्थितांचे वेधले लक्ष


■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी परळीत आयोजित केलेल्या जनता दरबारात एका चिमुकल्याच्या निरागस कृतीने काही क्षणांसाठी वातावरण हलकेफुलके झाले. सुरुवातीला सभागृहात रडत असलेला हा चिमुकला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासमोर येताच हसू लागला. एवढेच नव्हे, तर त्याने हात जोडून त्यांना नमस्कारही केला. या अनपेक्षित कृतीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पंकजाताई मुंडे याही या निरागस क्षणांमध्ये काही काळ बालविश्वात रममान झाल्याचे बघायला मिळाले.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा आज परळी येथे जनता दरबार होता.या जनता दरबारात जनतेची गाऱ्हाणी व तक्रारींचा निपटारा करत असताना सभागृहात उपस्थित अभ्यागता मध्ये लहान मूल रडण्याचा आवाज घुमला. हा रडण्याचा आवाज ऐकताच 'अरे कोणाशी बाळ रडत आहे त्यांना अगोदर पाठवा' अशी सूचना पंकजाताईंनी आपल्या कर्मचाऱ्यांना दिली. जेव्हा आपल्या आई समवेत हे बाळ पंकजाताई समोर आले त्यावेळी अगोदर रडणारा हा चिमुकला ताईसमोर येतात मात्र हसत नमस्कार घालू लागला. या चिमुकल्याचा नमस्कार पाहून पंकजाताई मुंडे यांनीही जनता दरबारातील आपले कामकाज काही काळ थांबवले.

परळी ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

जिरेवाडी शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा, 9 जणांवर गुन्हा दाखल



■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जिरेवाडी येथील एका शेतातील शेडमध्ये विनापरवाना बेकायदेशीररीत्या जुगार खेळणाऱ्या आणि खेळवणाऱ्या ९ जणांवर पोलिसांनी छापा टाकत मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी तब्बल ४ लाख ९० हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४:४५ वाजेच्या सुमारास जिरेवाडी येथील शेतातील शेडमध्ये काही जण स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना पैसे लावून 'तिरट' नावाचा जुगार खेळत व खेळवीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून परळी ग्रामीण पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी छापा टाकला.

घटनास्थळावर जुगार खेळताना आणि साहित्य बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी खालील ९ जणांना ताब्यात घेतले आहे.

आरोपींकडून जुगाराची नगदी रक्कम, विविध कंपन्यांचे ९ मोबाईल फोन, ३ मोटारसायकल (हिरो स्पेंडर, पॅशन प्रो, आणि रॉयल इन्फिल्ड) तसेच जुगाराचे पत्ते असा एकूण ४,९०,३३०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्याचे अंमलदार विशाल विजयकुमार वड मारे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

संपादकीय

युद्धात भारताची होरपळ

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्रायल-इराण संघर्षाचा फटका भारतातील सामान्य नागरिकांना बसत असून पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीचे दरही सातत्याने वाढत आहेत. इंधन दरवाढीमुळे सामान्य माणसाचा घरखर्च कोलमडत चालला आहे. युद्ध लांबत गेले तर भारतासारख्या इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोरील आर्थिक संकट आणखी भीषण होण्याची शक्यता आहे.

अमेरिका, इस्त्रायल, इराण युद्धामुळे इंधनाची सातत्याने दरवाढ होत आहे. पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीच्या दरातही १० दिवसांमध्ये चौथ्यांदा वाढ झाली आहे. इंधनात दरवाढ झाली की, महागाई आपोआप वाढते. महागाईवर नियंत्रण ठेवणे कोणालाच शक्य नाही. युद्धबंदीच्या चर्चा होतात, पुन्हा हल्ले होतात. यामुळे इंधनासाठी अवलंबून असलेले भारतासारखे देश होरपळून चालले आहेत. तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याची वेळ या देशांवर आली आहे. युद्धाबाबत अमेरिका व इराण कोणीही लवचिक भूमिका घेत नसल्याने युद्ध लांबण्याची शक्यता आहे. जगात कुठेही युद्ध पेटले की त्याची राख सर्वप्रथम सामान्य माणसाच्या चुलीवर पडते. आज नेमके तेच घडत आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षाने संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या खाईत ढकलले आहे. युद्धाच्या बातम्या टीव्हीवर दिसतात, क्षेपणास्त्रांचे आवाज मध्यपूर्वेत घुमतात; पण त्याचे भारतासारख्या विकसनशील देशांना चटके बसतात. कारण युद्ध जिथे होते, तिथे फक्त बॉम्ब पडत नाहीत, तर त्यासोबत जागतिक अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडते. तेलाच्या किमती उसळतात, डॉलर मजबूत होतो, आयात खर्च वाढतो आणि त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांच्या खिशाला बसतो. भारत आजही मोठ्या प्रमाणावर इंधनासाठी परदेशांवर अवलंबून आहे. कच्च्या तेलाची आयात थांबली किंवा दर वाढले की संपूर्ण अर्थचक्र हादरते. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीनंतर आता सीएनजीचे दरही दहा दिवसांत चौथ्यांदा वाढले आहेत. ही केवळ आकड्यांची वाढ नाही, तर ती सामान्य नागरिकांच्या जगण्यावर चाललेली आर्थिक चढाई आहे. रोज सकाळी पेट्रोल पंपावर दर बदलतात आणि त्याच वेगाने बाजारातील वस्तूंचे भाव वाढतात. भाजीपाला, दूध, धान्य, बांधकाम साहित्य, वाहतूक, औद्योगिक उत्पादन या सर्वच क्षेत्रांवर या इंधन दरवाढीचा परिणाम होतो.

महागाई ही केवळ आर्थिक संज्ञा नाही; ती गरिबाच्या थाळीतून कमी होणारी भाकरी आहे. जेव्हा इंधन महाग होते, तेव्हा ट्रकचे भाडे वाढते, वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा भार शेवटी ग्राहकावर टाकला जातो. त्यामुळे महागाई नियंत्रणाबाहेर जाते. सरकार कितीही आश्वासने देत असले, तरी वास्तव असे आहे की, इंधन दरवाढ झाली की महागाईला लगाम घालणे जवळपास अशक्य बनते. आज भारतातील मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग अक्षरशः तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत आहे. पगार वाढत नाहीत, रोजगाराची स्थिती स्थिर नाही, पण खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांमध्ये कामावर जाणाऱ्या सामान्य कर्मचाऱ्यापासून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यापर्यंत प्रत्येकजण या महागाईच्या आगीत भाजत आहे. या सर्व परिस्थितीमागे मध्यपूर्वेतील युद्धजन्य वातावरण मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणविरोधात घेतलेली आक्रमक भूमिका आणि त्याला इराणकडून मिळणारे प्रत्युत्तर यामुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे. युद्धबंदीच्या चर्चा होतात, शांततेच्या घोषणा केल्या जातात; पण दुसऱ्याच दिवशी पुन्हा हल्ले सुरू होतात. यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होते. तेल उत्पादक प्रदेशात तणाव वाढला की कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत भीती निर्माण होते आणि लगेच आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर वाढतात. अमेरिकेला तिची महासत्ता टिकवायची आहे, इस्त्रायलला स्वतःची सुरक्षा सिद्ध करायची आहे आणि इराणला झुकायचे नाही. या तीन शक्तींच्या अहंकाराच्या संघर्षात भारतासारख्या देशांची आर्थिक कोंडी होत आहे. युद्धात सहभागी नसतानाही भारताला त्याची किंमत मोजावी लागत आहे. कारण भारताकडे तेलाचे प्रचंड साठे नाहीत. देशाला ऊर्जा हवी असेल, उद्योग चालवायचे असतील, वाहतूक सुरळीत ठेवायची असेल तर आयात केलेल्या तेलावर अवलंबून राहावेच लागते.

युद्ध जितके लांबेल, तितका भारतावरचा आर्थिक दबाव वाढणार आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाला की, आयात अधिक महाग होते. सरकार कर कमी करून नागरिकांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न करू शकते; पण त्यालाही मर्यादा आहेत. कारण सरकारलाही महसूल हवा असतो. परिणामी सामान्य नागरिक दोन्हींकडून भरडला जातो, एकीकडे महाग इंधन आणि दुसरीकडे वाढती महागाई. आज परिस्थिती इतकी गंभीर बनली आहे की, लोकांच्या आर्थिक नियोजनाचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. सीएनजी दरवाढीचा सर्वात मोठा फटका रिक्षाचालक, टॅक्सीचालक आणि छोट्या वाहतूक व्यावसायिकांना बसत आहे. त्यांचे उत्पन्न वाढत नाही; पण खर्च मात्र प्रचंड वाढतो आहे. शेवटी तेही भाडेवाढ करतात आणि त्याचा भार पुन्हा सामान्य माणसालाच सहन करावा लागतो. सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे या संकटावर कोणाकडेही ठोस उपाय दिसत नाही. युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निष्प्रभ ठरत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठका होतात, निवेदने दिली जातात; पण प्रत्यक्षात युद्धबंदी घडताना दिसत नाही. अमेरिका आणि इराण दोघेही माघार घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. इस्त्रायलची भूमिका देखील अधिक आक्रमक होत चालली आहे. त्यामुळे हा संघर्ष दीर्घकाळ सुरू राहण्याची भीती वाढत आहे. भारताने आता या परिस्थितीकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहून चालणार नाही. दीर्घकालीन ऊर्जा धोरण अधिक मजबूत करावे लागेल. पर्यायी ऊर्जा स्रोत, इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार, सौरऊर्जा, जैवइंधन आणि स्थानिक ऊर्जा उत्पादन यावर आक्रमक गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक आंतरराष्ट्रीय युद्धानंतर भारताला अशाच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागेल. जगातील महासत्ता आपापल्या राजकीय आणि सामरिक स्वार्थासाठी संघर्ष करत राहतील; पण त्याची किंमत भारतातील सामान्य माणूस रोज पेट्रोल पंपावर, बाजारात आणि घरखर्चात चुकवत राहणार आहे. हे युद्ध फक्त मध्यपूर्वेत सुरू नाही, तर ते भारतातील प्रत्येक घराच्या अर्थसंकल्पावर चालले आहे. इंधन दरवाढ आणि महागाईच्या रूपाने सामान्य नागरिक रोज या युद्धाचे घाव सहन करत आहे आणि जर अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांनी आपली आक्रमक भूमिका बदलली नाही, तर येणारे दिवस आणखी भयावह ठरू शकतात.

शालेय बास्केटबॉल स्पर्धेचा उत्साह

■ नवी मुंबई : प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे यांचे सहकार्याने नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे सन 2009-10 पासून सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने सन 2026-27 या शैक्षणिक वर्षातील नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय बास्केटबॉल स्पर्धा क्राईस्ट अकॅडमी स्कुल, से-23, कोपरखैरणे येथील शाळेच्या बास्केटबॉल कोर्टवर उत्साहात संपन्न झाल्या.

या बास्केटबॉल स्पर्धेमध्ये 14, 17 व 19 वर्षाआतील मुले व मुलींच्या स्वतंत्र गटात एकूण 104 संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा शुभारंभ क्रीडा सांस्कृतिक व युवक कल्याण समिती उपसभापती राजू मढवी यांच्या शुभहस्ते, समिती सदस्य दिक्षा कचरे, ऐश्वर्या सोनवणे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव व शाळेचे विश्वस्त फा.जेसन यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेतील 14 वर्षाआतील मुलांच्या गटात फा.ॲग्नल स्कुल, वाशी विरुद्ध क्राईस्ट अकॅडमी , कोपरखैरणे यांच्यात झालेल्या पहिल्या उपांत्य फेरी सामन्यात फा.ॲग्नल स्कुल, वाशी संघाने 23 : 13 अशा 10 गुणाने जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला. तसेच दुस-या उपांत्य फेरीत डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल, नेरुळ यांनी न्यु होरायझन पब्लिक स्कूल ऐरोली यांच्यावर 06:03 अशा 03 गुणांनी मात करीत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. या गटातील अंतिम सामन्यात डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल नेरुळ यांनी फा.ॲग्नल स्कुल, वाशी यांच्यावर 06:04 अशा 02 गुणांनी मात करून अजिंक्यपद पटकाविले आणि मुंबई विभागस्तर स्पर्धेसाठी पात्रता संपादन केली.स्पर्धेतील 14 वर्षाआतील मुलींच्या गटात पहिल्या उपांत्य फेरीत विबग्योर स्कूल ऐरोली यांनी न्यू होरायझन पब्लिक स्कूल ऐरोली यांच्यावर 15:08 अशा 07 गुणांनी मात केली तसेच दुस-या उपांत्य फेरीत डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल नेरुळ यांनी रिलायन्स फाउंडेशन स्कूल कोपरखैरणे यांच्यावर 08:02 अशा 06 गुणांनी मात करून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. या वयोगटातील मुलींचा अंतिम सामना डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल नेरुळ आणि विबग्योर स्कूल ऐरोली यांच्यात होऊन डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल नेरुळ शाळेचा संघ 13:08 अशा 05 गुणांनी विजयी झाला.

त्यांनी मुंबई विभागस्तर स्पर्धेसाठी पात्रता मिळविली.स्पर्धेत 17 वर्षाआतील मुलांच्या गटातील पहिली उपांत्य फेरी क्राईस्ट अकॅडमी कोपरखैरणे यांनी दिल्ली पब्लिक स्कूल नेरुळ यांच्यावर 31:15 अशी 16 गुणांनी जिंकली तसेच दुसरी उपांत्य फेरी डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल नेरुळ यांनी प्रेझेंटेशन कॉन्व्हेन्ट स्कूल नेरुळ यांच्यावर 12:02 अशी 10 गुणांनी जिंकली व अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. या फेरीतील अंतिम सामना क्राईस्ट अकॅडमी कोपरखैरणे यांनी डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल नेरुळ यांच्यावर 28:10 अशा 18 गुणांनी मात करीत जिंकला व मुंबई विभागस्तर स्पर्धेसाठी पात्रता संपादन केली.

17 वर्षाआतील मुलींच्या गटात पहिली उपांत्य फेरी दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळ यांनी 16:06 अशा 10 गुणांनी क्राईस्ट अकॅडमी कोपरखैरणे यांच्यावर मात करून जिंकली तसेच दुसरी उपांत्य फेरी टिळक पब्लिक स्कूल नेरुळ यांनी 08:02 अशी 10 गुणांनी फिनिक्स इंटरनॅशनल स्कूल ऐरोली यांच्यावर मात करीत जिंकली. या गटातील अंतिम सामन्यात दिल्ली पब्लिक स्कूल नेरुळ 13:09 अशा 4 गुणांनी टिळक पब्लिक स्कूल नेरूळ यांच्यावर मात करीत अंतिम विजेता ठरला व मुंबई विभागस्तर स्पर्धेसाठी पात्र झाला. 19 वर्षाआतील मुलांच्या गटात पहिल्या उपांत्य फेरीत क्राईस्ट अकॅडमी कोपरखैरणे यांनी टिळक ज्युनिअर कॉलेज नेरुळ यांच्यावर 13:11 अशा 02 गुणांनी मात केली तर दुस-या उपांत्य फेरीत फा. ॲग्नल स्कूल वाशी यांनी 27:08 अशी 19 गुणांनी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी यांच्यावर बाजी मारली.

कर्मचाऱ्यांसमोर शेर आणि प्रत्यक्ष सभागृहात ढेर !

■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी....



परळी नगर परिषदेमध्ये कर्मचाऱ्यांच्या शिस्तीचा आणि प्रशासनातील कारभाराचा मुद्दा उपस्थित करत 'नगर परिषदेत चालतंय तरी काय?' या उपक्रमाच्या माध्यमातून रीलद्वारे भूमिका मांडणाऱ्या १६ नगरसेवकांनी आजच्या सर्वसाधारण सभेत मात्र याच विषयावर ठाम भूमिका का घेतली नाही, कर्मचाऱ्यांसमोर शेर आणि प्रत्यक्ष सभागृहात ढेर का झाले? असा सवाल काँग्रेसचे बीड जिल्हा उपाध्यक्ष सय्यद हनीफ उर्फ बहादूरभाई यांनी उपस्थित केला आहे.

नगर परिषदेत कर्मचाऱ्यांच्या शिस्तीचा प्रश्न उपस्थित करत सोशल मीडियावर आक्रमक भूमिका मांडणारे नगरसेवक प्रत्यक्ष सर्वसाधारण सभेत या विषयावर का बोलले नाहीत? कर्मचाऱ्यांसमोर आक्रमक भूमिका आणि प्रत्यक्ष निर्णय करायचा सभागृहात मात्र मौन, अशी भूमिका का दिसून आली?, असा प्रश्न बहादूरभाई यांनी उपस्थित केला. कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील शिस्त, नगरसेवकांची प्रलंबित कामे आणि प्रशासनाकडून मिळणारी माहिती या मुद्द्यांवर सभागृहात ठोस चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील आक्रमक भूमिकेचे प्रतिबिंब सभेतील चर्चेत दिसले का, याचे उत्तर संबंधित नगरसेवकांनी द्यावे, असे आव्हानही त्यांनी दिले. सोशल मीडियावर व्यक्त केलेली नाराजी आणि प्रत्यक्ष सभागृहातील भूमिका यामध्ये तफावत असल्याचा आरोप करत, नगरसेवकांनी केवळ रीलपुरती आक्रमकता न दाखवता शहराच्या प्रश्नांवर सभागृहातही ठामपणे आवाज उठवावा, अशी अपेक्षा सय्यद हनीफ उर्फ बहादूरभाई यांनी व्यक्त केली आहे. कर्मचाऱ्यांसमोर शेर आणि सभागृहात ढेर?" अशी अवस्था झाल्याचा बोचरा सवाल उपस्थित करत बहादूरभाईंनी या नगरसेवकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई शहर पोलिसांचे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

घर बंद करून बाहेरगावी जाताना विशेष काळजी घ्या; चोरीच्या घटना टाळण्यासाठी पोलिसांनी दिल्या महत्त्वपूर्ण सूचना, संशयास्पद हालचाली दिसल्यास ११२ वर संपर्क साधण्याचे आवाहन!

अंबाजोगाई (प्रतिनिधी) : दिवाळी सणानिमित्त नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असताना अनेक कुटुंबे सण साजरा करण्यासाठी बाहेरगावी जात असतात. याच संधीचा फायदा घेत बंद घरांना चोरट्यांकडून लक्ष्य केले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घराच्या सुरक्षिततेबाबत विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन बीड जिल्हा पोलीस दलाच्या अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये अनेक नागरिक कुटुंबासह गावाकडे किंवा पर्यटनासाठी जात असल्याने घरे बंद राहतात. अशा परिस्थितीत घरफोडी व चोरीच्या घटना घडू नयेत, यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देणारे जनजागृती आवाहन प्रसिद्ध केले आहे.

घर सुरक्षित ठेवण्यासाठी पोलिसांच्या महत्त्वपूर्ण सूचना

नागरिकांनी घराचे मुख्य दरवाजे, मागील दरवाजे व



खिडक्या व्यवस्थित बंद करून कुलूप लावावे. शक्य असल्यास अतिरिक्त सुरक्षा लॉकचा वापर करावा. घरात सीसीटीव्ही कॅमेरे, व्हिडिओ डोअर बेल व सुरक्षा अलार्म बसवावेत. घरातील मौल्यवान दागिने, रोख रक्कम व महत्त्वाच्या वस्तू उघड्यावर ठेवू नयेत. शक्यतो बँकेच्या लॉकरचा वापर करावा.

घर बंद असताना घरातील दिवे व बाहेरील लाईट सुरू ठेवण्यासाठी ऑटोमॅटिक टायमर किंवा स्मार्ट लाईट सिस्टीमचा वापर करावा. अनावश्यक विद्युत उपकरणे बंद करावीत. तसेच बाहेरगावी जात असल्याची माहिती शेजारी, सोसायटी पदाधिकारी किंवा विश्वासू व्यक्तींना द्यावी. वृत्तपत्रे, दूध व पाण्याची नियमित येणारी व्यवस्था काही दिवसांसाठी बंद करावी. बाहेरगावी जात असल्याचे फोटो, प्रवासाचे तपशील किंवा घर रिकामे असल्याची माहिती सोशल मीडियावर टाकणे टाळावे. घराच्या चाव्या शू रॅक, मीटर बॉक्स किंवा दरवाजाजवळ लपवून ठेवू नयेत.

दिवाळीच्या काळात चोरीच्या घटना रोखण्यासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांकडून विशेष पोलीस गस्त घालण्यात येणार असून संवेदनशील भागात पेट्रोलिंग व बिटमार्शलमार्फत तपासणी केली जाणार आहे. संशयित व्यक्ती व वाहनांवर लक्ष ठेवण्यासह बंद घरे असलेल्या परिसरात नियमित गस्त घालण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

आपल्या परिसरात अनोळखी किंवा संशयास्पद व्यक्ती फिरताना दिसल्यास, घरफोडीचा प्रयत्न अथवा कोणतीही संशयास्पद हालचाल निदर्शनास आल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. यासाठी पोलीस हेल्पलाईन क्रमांक ११२ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिवाळीचा आनंद साजरा करताना आपल्या घराच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करू नका. नागरिकांनी स्वतःच्या घरासोबतच शेजाऱ्यांच्या घरांचीही काळजी घ्यावी. नागरिकांचे सहकार्य आणि पोलिसांची सतर्कता यामुळे चोरीच्या घटनांना आळा घालणे शक्य होणार आहे.

'सतर्क राहा, सुरक्षित राहा!' हा संदेश देत अंबाजोगाई शहर पोलिसांनी नागरिकांना सुरक्षित दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे.



दलित आणि ललित जाणिवांची समृद्ध वीण: कवितेच्या वळणवाटा :प्रा.वा. ना.आंधळे

जेष्ठ कवी भगवान भटकर यांच्या कवितेच्या वळणवाटा व तुकबंदी या दोन काव्यसंग्रहाचे थाटात प्रकाशन संपन्न

जळगाव : कवी भगवान भटकर यांचा लेखनपिंड मानवतावादी असून समाजाचं किडलेपण, सामान्यांच्या,उपेक्षितांच्या वाट्यात येणारी दुरावस्था या व्यथा त्यांच्या सृजनातून सक्षमतेने येतात.ज्या ताकदीनं ते विद्रोही भूमिका मांडतात त्याच ताकदीनं ते लालित्याचीही कास सृजनातून साकारतात.कविश्रेष्ठ भटकर यांची कविता आत्मस्वर लाभलेली कविता मला वाटते.असे भावोद्गार सुप्रसिद्ध कवी तथा समीक्षक प्रा. वा. ना.आंधळे यांनी उपस्थित काव्यरसिकांसमोर व्यक्त केलेत.

आज दि.१नोव्हेम्बर २०२६ रोजी जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील अल्पबचतभवनाच्या सभागृहात जेष्ठ कवी भगवान भटकर यांच्या 'कवितेच्या वळणवाटा(मराठी काव्यसंग्रह)चे प्रकाशन कवी प्रा.वा. ना.आंधळे यांच्या शुभहस्ते तर 'तुकबंदी'(हिंदी काव्यसंग्रह) चे प्रकाशन डॉ.रफिक काझी यांच्या शुभहस्ते मोठ्या थाटात संपन्न झाले.त्याप्रसंगी प्रा.आंधळे यांनी हे सूतोवाच केले.त्यांनी आपल्या भाषणातून कवी भटकर यांनी मुक्तछंद,ओवी,गितकाव्य, गझल,लावणी,चारोळी,तीनोळी या साऱ्या काव्यप्रकारांना लिलया पेलत केलेल्या मूल्याधिष्टीत काव्य प्रवासाचे भरभरून कौतुक केले. तर डॉ.काझी यांनी तुकबंदीच्या लेखन सौंदर्यावर प्रकाश टाकीत कवी भटकर यांच्या सृजन सामर्थ्याचा परिचय करून देतांना काही गझलांचा साधार परामर्श उपस्थितांसमोर मांडला. कवी भगवान भटकर यांनी आपल्या मनोगतातून आपला काव्यप्रवास व रसिक श्रोते व साहित्यिक मित्रपरिवारासह आपल्या कुटूंबाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तर अध्यक्षीय भाषणातून प्रा.डॉ.देवेंद्र इंगळे यांनी कवी भटकर यांच्यातल्या माणुसपणावर प्रकाश टाकीत त्यांच्या आकाशवाणी व सह्याद्रि दूरदर्शनवरील लेखन सादरीकरणाच्या कर्तृत्वाचा आलेख श्रोत्यांसमोर आणला.

यावेळी व्यासपीठावर अथर्व प्रकाशन संस्थेचे संचालक तथा प्रमुख अतिथी युवराज माळी, सौ.यशोदाताई भटकर,डॉ.सुधीर भटकर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या सुंदर आयोजनासह सर्वोत्कृष्ट नियोजन डॉ.सुधीर भटकर आणि त्यांच्या मित्रपरिवाराने केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे सुसूत्र संचालन कवी डॉ.अशोक पारधे सरांनी केले. आभार कवी गौरव हरताळे यांनी मानले.सदर कार्यक्रमास कवी,साहित्यिक यांचे समवेत भटकर परिवारावर प्रेम करणाऱ्या स्नेहीजनांची उपस्थिती लाभली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

ना. पंकजाताई मुंडेंमुळे पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ ; कॅबिनेट बैठकीत झाला निर्णय

हा निर्णय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा ; निर्णयाबद्दल ना. पंकजाताईंनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार



मुंबई | पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय हा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा आणि ग्रामीण पशुवैद्यकीय आरोग्यसेवेला बळकटी देणारा आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळणार असून, ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये सेवा देण्यासाठी त्यांना अधिक प्रोत्साहन मिळेल, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या पशुवैद्यक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आंतर्वासिता निर्वाह भत्यात सात हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. भारतीय पशुचिकित्सा परिषदेच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या पशुचिकित्सालयात एक वर्षासाठी आंतर्वासिता पशुवैद्यक म्हणून काम करणे अनिवार्य असते. या कालावधीत त्यांच्या निवास, भोजन आणि प्रवासासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चापोटी अकरा हजार रुपये दिले जात असत. पण आता त्यांना दरमहा अठरा हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला. यापैकी पंधरा हजार रुपये राज्य शासन देणार आहे. उर्वरित तीन हजार रुपये भारतीय कृषि अनुसंधान परिषद आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या निधीमधून देण्यात येणार आहे. अनुसंधान परिषद केवळ सहा महिन्यासाठी निधी देते. त्यापुढील सहा महिन्याचा निधी देण्यासाठी विद्यापीठाच्या स्वनिधीमधून खर्च करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला.

■ पशुपालकांना दर्जेदार सेवा मिळेल

या निर्णयावर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, राज्यातील पशुधनाचे आरोग्य जपणे, पशुपालकांना दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील पशुचिकित्सा यंत्रणा अधिक सक्षम करणे, हे शासनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या उद्देशाने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पशुवैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अंतिम टप्प्यात प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभव मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. या कालावधीत विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये काम करण्याची, पशुधनाच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेण्याची तसेच प्रत्यक्ष पशुचिकित्सा सेवेत सहभागी होण्याची संधी मिळते. या विद्यार्थ्यांच्या कामाचे महत्त्व आणि त्यांच्यावर असलेली जबाबदारी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

■ पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, या निर्णयामुळे पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना आर्थिक आधार मिळण्याबरोबरच ग्रामीण भागात सेवा देण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील पशुचिकित्सालयांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता वाढविण्यास या निर्णयाचा हातभार लागेल. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल, त्यांच्या कौशल्यात वाढ होईल आणि भविष्यात सक्षम पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा देण्यासाठी त्यांची तयारी अधिक चांगल्या प्रकारे होईल.

राज्य शासनाचा हा निर्णय केवळ विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्यापुरता मर्यादित नसून, राज्यातील पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, ग्रामीण भागाला सक्षम पशुवैद्यकीय मनुष्यबळ आणि शेतकरी-पशुपालकांना अधिक चांगल्या सेवा, असा या निर्णयाचा व्यापक उद्देश आहे. राज्यातील पशुधनाचे संवर्धन आणि पशुपालकांचे आर्थिक हित जपण्यासाठी शासन यापुढेही आवश्यक त्या उपाययोजना करण्यास कटिबद्ध आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.


पाणीचोरी रोखण्यासाठी वीज तोडण्याचे जलसिंचन विभागाचे आदेश

परळी / प्रतिनिधी

वाण धरणातील पाणीसाठा तळाला गेला असताना आणि परळीकरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी तो राखीव ठेवण्यात आला असताना, 'ओंकार साखर कारखाना प्रा. लि. (युनिट नं. ८)' बेकायदेशीरपणे पाण्याचा उपसा करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या मुजोर कारखान्याला चपराक लावण्यासाठी वाण धरण जलसिंचन विभागाने थेट महावितरणला पत्र लिहून कारखान्याच्या पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा तात्काळ खंडित करण्याची धडक मागणी केली आहे.

वाण धरणातील अत्यल्प पाणीसाठा लक्षात घेता, जिल्हाधिकाऱ्यांनी हे पाणी परळी शहरासाठी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवले आहे.असे असून देखील दुष्काळजन्य परिस्थिती मध्ये ओंकार साखर कारखाना कोणत्याही परवानगीशिवाय अनधिकृतपणे पाणी उपसत आहे. यापूर्वी अधिकृतरीत्या कळवूनही कारखान्याने पाणी उपसा थांबवला नाही. कारखान्याची ही अरेरावी पाहता, वाण सिंचन शाखेच्या अधिकाऱ्यांनी महावितरणच्या उपविभागीय अभियंत्यांना अधिकृत पत्र पाठवून ओंकार साखर कारखान्याच्या पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा त्वरित खंडित करण्याची ठोस कारवाई प्रस्तावित केली आहे.

एकीकडे जनता पाण्यासाठी वणवण भटकण्याची शक्यता असताना, कारखान्याकडून होणारी ही बेसुमार पाणीचोरी संतापजनक आहे. जलसिंचन विभागाने उचललेल्या या कठोर



वाण सिंचन शाखा
परळी वै.

प्रति,
मा. उपविभागीय अभियंता,
महावितरण कार्यालय,
परळी वै.

विषय : ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट नं.८ यांचा विद्युत पुरवठा बंद करणेबाबत

संदर्भ : : 1) जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र -जा.क्र.२०२५
/महसूल२/प./त.पाणीआ.क./सो./ 1/7/पि.पाणी आरक्षण – २०२५-२६
2) जलसिंचन शाखा वाण यांचे पत्र - जा.क्र. १४०/वाण/ सो

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र 1 अन्वये मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशान्वये वाण धरणातील पाणीसाठा अत्यल्प असल्यामुळे परळी शहरासाठी पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे.

संदर्भीय पत्र क्र 2 अन्वये ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट क्र ८ यांस दुष्काळजण्य परिस्थितीमुळे पाण्याचा विना परवाना अनधिकृत पाणी उपसा बंद करण्यात यावा, हे कळविले होते. परंतु सद्य स्थितीत आजही विना परवाना अनधिकृत पाणी उपसा चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट नं ८ यांचा पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडित करण्यात यावा, ही विनंती.

शाखाधिकारी
जलसिंचन शाखा वाण

प्रत : 1) मा.कार्यकारी अभियंता, माजलगाव पाटबंधारे विभाग, परळी वै. यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा. तहसीलदार साहेब, तहसील कार्यालय परळी वै यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर
3) उपविभागीय अधिकारी, उपविभाग अंबाजोगाई यांना माहितीस्तव सविनय सादर

पावलामुळे बेकायदेशीर पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. आता महावितरण यावर किती वेगाने कारवाई करते, याकडे लक्ष लागून आहे.

नगर परिषदेची सभा लाईव्ह करण्यास विरोध का? जनतेच्या प्रश्नांपासून पळ कशासाठी?

गटनेते नितीन बागवाले यांचा सवाल; प्रश्न मांडत असतानाच नगराध्यक्षांच्या पतीकडून विरोध

पत्रकारांना प्रवेश नाकारण्याची भूमिका लोकशाहीला पोषक नाही!



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

परळी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज ऑनलाइन लाईव्ह करून जनतेसाठी खुले करावे, तसेच सभागृहात पत्रकारांना प्रवेश देऊन वार्तांकनाची परवानगी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नगरसेवक तथा गटनेते नितीन बागवाले यांनी बुधवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत केली.

बागवाले सभागृहात आपली मागणी आणि प्रश्न व्यवस्थित मांडत असताना नगराध्यक्षांच्या पतीने त्याला विरोध केल्याने सभेत हा विषय चर्चेचा ठरला. नगरपरिषदेचा कारभार जनतेच्या पैशातून चालतो, त्यामुळे सभेतील चर्चा आणि निर्णय जनतेला समजलेच पाहिजेत, अशी भूमिका बागवाले यांनी मांडली.

शहरात तीव्र पाणीटंचाईसह अनेक नागरी समस्या असताना सभागृहात जनतेच्या प्रश्नांवर काय चर्चा होते, हे नागरिकांना समजण्याचा अधिकार आहे. मग सभेचे कामकाज लाईव्ह करण्यास विरोध कशासाठी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सभेत ५० टक्के महिला सदस्य असल्याचे कारण पुढे करून लाईव्ह कामकाजाला विरोध करण्यात आल्याचा मुद्दाही समोर आला. मात्र, महिला लोकप्रतिनिधींचा सन्मान राखूनही सभेचे कामकाज पारदर्शकपणे जनतेसमोर मांडता येऊ शकते, असे बागवाले यांनी स्पष्ट केले.

याशिवाय पत्रकारांना सभागृहात प्रवेश देऊन स्वतंत्र आसनव्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. आता नगरपरिषदेची सभा लाईव्ह करण्याच्या मागणीवर नगराध्यक्ष आणि सत्ताधारी काय भूमिका घेतात, याकडे परळीकरांचे लक्ष लागले आहे.

■ पत्रकारांना प्रवेश नाकारण्याची भूमिका लोकशाहीला पोषक नाही!

नगरपरिषदेच्या सभागृहातील चर्चा, निर्णय आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिका जनतेपर्यंत पोहोचविण्यात पत्रकारांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे सर्वसाधारण सभेत पत्रकार बांधवांसाठी स्वतंत्र आसनव्यवस्था करून त्यांना सभेचे कामकाज पाहण्याची व वार्तांकन करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणीही बागवाले यांनी केली.

मिरवणूक काढता आली नाही म्हणून ईगो दुखावला का?:रोहित पवारांचा भाजपवर हल्लाबोल

मुंबई | कोल्हापूरच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या 'गोकुळ दूध संघा'च्या निवडणुकीवरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीने या निवडणुकीत बहुमत मिळवले असताना, राज्य सरकारकडून तज्ज्ञ (शासकीय) सदस्यांची नियुक्ती करून गोकुळवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप होत आहे. यावरून आता राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते आणि आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. त्यांनी या हस्तक्षेपाला 'विनाशकाले विपरीत बुद्धी' म्हणत, सतेज पाटील यांना भक्कम पाठिंबा दर्शवला आहे.

■ 'हा जनमताचा अनादर आणि विनाशकाले विपरीत बुद्धी'

आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून पोस्ट करत रोहित पवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, "'गोकुळ'च्या निवडणुकीत साडेपाच लाख सभासदांनी दिलेले जनमत बाजूला सारून शासकीय सदस्य नेमत गोकुळ ताब्यात घेण्याचा डाव म्हणजे 'विनाशकाले विपरीत बुद्धी' असंच म्हणावं लागेल. निकालाच्या दिवशी कोल्हापुरात राहून मिरवणूक काढता आली नाही म्हणून तुमचा ईगो दुखावला असेल, तर मग काय शासकीय सदस्य नेमून लोकमताशी छेडछाड करण्याचा प्रयत्न करणार का? सरकारचा हा निर्णय म्हणजे निव्वळ अराजकता आहे."

■ 'हे असले विषारी साप आताच ठेचले पाहिजेत'

गोकुळचा विषय केवळ बंटी पाटील आणि कोल्हापूरपुरता मर्यादित नाही, तर तो लोकशाही आणि संविधानावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचा आहे. आज यांनी गोकुळमध्ये रडीचा डाव केला, उद्या लोकसभा निवडणूक पराभूत झाल्यावरही हे रडीचा डाव खेळतील. त्यामुळे हे असले विषारी साप आताच ठेचले पाहिजेत," असा घणाघात रोहित पवार यांनी केला.

■ 'अध्यक्ष निवडीच्या दिवशी गोकुळला घेराव घाला'

जनतेला आणि कार्यकर्त्यांना थेट संघर्षाचे आवाहन करताना



ते म्हणाले, "ज्या दिवशी गोकुळची अध्यक्ष निवड राहील, त्या दिवशी संपूर्ण लोकशाही प्रेमी आणि संविधान प्रेमी नागरिकांनी गोकुळला घेराव घातला पाहिजे. जनमताची ताकद काय असते, हे आपण मुंबईपासून दिल्लीपर्यंत दाखवून द्यायला हवे."

शेवटी, गोकुळचे सभासद आणि बंटी पाटलांसोबत संपूर्ण महाराष्ट्र खंबीरपणे उभा आहे," असा विश्वास देत रोहित पवार यांनी या लढ्यात महाविकास आघाडी सतेज पाटलांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचे स्पष्ट केले आहे.

दिवाळी सणाच्या फराळावर महागाईचे सावट: दुष्काळ, बाजारातील आवक घटल्याने किराणा साहित्याचे भाव वाढले

खामगाव | दिवाळीचा सण म्हटला की, घरोघरी पारंपरिक फराळ आणि गोड-धोड पदार्थांची रेलचेल असते. मात्र, यंदा फराळ तयार करण्यासाठी लागणाऱ्या अत्यावश्यक किराणा साहित्याच्या दरात मोठी वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांचे आणि गृहिणींचे घरातील बजेट पुरते कोलमडले आहे.

यंदा दुष्काळी परिस्थिती आणि बाजारातील आवक घटल्याने जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमालीचे वाढले आहेत. दिवाळी हा लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्या आवडीचा सण. सणात घरोघरी बनणाऱ्या फराळाची चव चाखण्यासाठी प्रत्येक जण उत्सुक असतो. मात्र, आधीच वाढत्या महागाईमुळे त्रस्त असलेल्या कुटुंबांवर या सण काळातील दरवाढीने अतिरिक्त भार टाकला आहे. साहित्याची खरेदी करताना नागरिकांना खिशाला मोठा चाट बसत असून सणाचा उत्साह साजरा करताना खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे लागत आहे. प्रातिनिधीक छायाचित्र.

{ खाद्यतेल: पूर्वी १५० रुपये प्रतिलिटर असणारे खाद्यतेल आता १८० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. { साखर : पूर्वी ४० रुपये किलो मिळणारी साखर आता बाजारात ६० ते ७० रुपये प्रति किलोने विकावी लागत



आहे. { इतर साहित्य : बेसन, मैदा, रवा, पोहे, विविध डाळी आणि सुका मेवा यांच्याही किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. या दरवाढीमुळे चकली, करंजी, बेसन-रवा लाडू, चिवडा आणि शंकरपाळे यासारखे पारंपरिक दिवाळीचे फराळ तयार करणे महागडे ठरत आहे.

दिवाळी साहित्य आणि कपड्यांच्या खरेदीसाठी ग्राहकांची लगबग

खामगाव | वर्षातील मोठा सण असलेल्या दिवाळीला अवघे काही दिवस शिल्लक असल्याने खामगाव शहरातील बाजारपेठ सजली आहे. यंदा ८ नोव्हेंबर रोजी दिवाळी साजरी होणार असून, सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारात आकाशदिवे, मातीच्या पणत्या, फटाके, पूजेचे साहित्य, मिठाई आणि कपड्यांची दुकाने विविध वस्तूंनी सजली आहेत.

सध्या बाजारपेठेत खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी तुलनेने कमी असली, तरी पगार आणि बोनस मिळाल्यानंतर खरेदीला वेग येईल, अशी अपेक्षा व्यापाऱ्यांना आहे. प्रत्येकजण आपापल्या गरजेनुसार आणि आर्थिक परिस्थितीनुसार खरेदीचे नियोजन करत आहे. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा ग्रामीण ग्राहकांच्या खरेदीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कपडे, पादत्राणे, सौंदर्यप्रसाधने, किराणा आणि दागिन्यांच्या खरेदीसाठी ऑनलाइन माध्यमांचा वापर वाढत आहे. विविध दिवाळी सवलती आणि ऑफर्समुळे ग्राहक ऑनलाइन खरेदीकडे वळत असल्याने स्थानिक बाजारपेठेतील गर्दीवर त्याचा काही प्रमाणात परिणाम होत आहे.



दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
● बीड, गुरुवार, 5 नोव्हेंबर 2026
Last page

परळी नगर परिषदेत आधुनिक वाहनांची भर; सक्शन मशीन, आपत्ती व्यवस्थापनासाठी बोट आणि बुलेट दाखल!

नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत वाहनांचे लोकार्पण

परळी वैजनाथ : प्रतिनिधी

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज करण्याच्या दृष्टीने परळी नगर परिषदेत नवीन वाहनांची भर पडली आहे. नगर परिषदेकडे सक्शन मशीन, आपत्ती व्यवस्थापनासाठी बोट तसेच बुलेट उपलब्ध झाली असून, या वाहनांचे लोकार्पण नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी आणि सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शहरातील स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन तसेच विविध नागरी सुविधांच्या कामांना गती देण्यासाठी सक्शन मशीन उपयुक्त ठरणार आहे. तर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूरस्थिती अथवा जलमय भागातील आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी आपत्ती व्यवस्थापनाची बोट महत्त्वाची भूमिका बजावू शकते. याशिवाय बुलेटमुळे आपत्कालीन कामकाज आणि क्षेत्रीय पातळीवरील हालचालींना मदत होणार आहे. शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता नगर परिषदेकडे आवश्यक यंत्रसामग्री आणि साधनसामग्री उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. नव्याने दाखल झालेल्या या वाहनांमुळे स्वच्छता व आपत्ती व्यवस्थापनाच्या कामकाजाला अधिक बळ मिळणार आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, यांच्यासह सर्व सभापती, गटनेते, नगरसेवक आणि नगर परिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



हातोळणच्या विद्या मिसाळ कोठावळे यांना 'नवदुर्गा सन्मान पुरस्कार २०२६' प्रदान

प्रतिनिधी - सोपान पगारे

अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने आयोजित 'कर्तृत्ववान प्रगतशील नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६' मध्ये आष्टी तालुक्यातील हातोळण येथील विद्या मिसाळ कोठावळे यांना 'नवदुर्गा सन्मान पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. हा सोहळा पुणे येथें दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मेघना ताई बोर्डीकर, मुंबईच्या महापौर ऋतुताई तावडे, तसेच ज्योतीताई मेटे (समाजसेविका) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विद्या मिसाळ कोठावळे या मुंबई येथे नोकरीची जबाबदारी सांभाळत असतानाच समाजाच्या प्रगतीसाठी निस्वार्थ भावनेने विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेत आहेत. त्यांनी समाजासाठी केलेले उल्लेखनीय कार्य, सामाजिक बांधिलकी आणि दिलेले योगदान यांची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र व पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

या सोहळ्याचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष ओंकार देशमुख, उपाध्यक्ष अभिजीत खैरे, सचिव संदीप नौसुपे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.

या सन्मानाबद्दल विद्या मिसाळ कोठावळे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



आष्टी पंचायत समिती कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी रोहित सायकड, तर व्हाईस चेअरमनपदी बाबुराव आंधळे यांची बिनविरोध निवड!

नवनिर्वाचित चेअरमन यांचाआष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

आष्टी प्रतिनिधी :

आष्टी पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी रोहित सायंकड, तर व्हाईस चेअरमनपदी बाबुराव आंधळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता पतसंस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवड प्रक्रिया पार पडली.

पतसंस्थेचे विद्यमान चेअरमन असलम बेग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत चेअरमन पदासाठी नवनियुक्त कनिष्ठ अभियंता रोहित सायकड, तर व्हाईस चेअरमन पदासाठी बाबुराव आंधळे यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाल्याने दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एस. ए. गायकवाड यांनी काम पाहिले, तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून पतसंस्थेचे सचिव विलास सोनवणे यांनी सहकार्य केले.



दरम्यान, नवनिर्वाचित चेअरमन रोहित सायकड यांचा आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप, शरद तळेकर, प्रवीण पोकळे, भीमराव गुरव, उपाध्यक्ष शरद रेडेकर, मनोज पोकळे, सचिन रानडे, गणेश दळवी यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

वनमालाताई राठोड कला विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी सुरक्षा व सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

महागाव प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या वैयक्तिक सुरक्षिततेविषयी सजगता निर्माण करणे, सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या आव्हानांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि डिजिटल माध्यमांच्या विवेकपूर्ण वापराची जाणीव दृढ करणे, या उद्देशाने पोलीस स्टेशन महागावच्या वतीने वनमालाताई राठोड कला विज्ञान महाविद्यालय, आमणी येथे विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रियदर्शनी शिक्षण संस्थेच्या सचिव आदरणीय श्रीमती वनमालाताई राठोड होत्या. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून महागाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सेवानंद वानखेडे, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रियदर्शनी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. सुनीलभाऊ राठोड उपस्थित होते.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक सुरक्षा, गुड टच-बॅड टच, बालकांचे संरक्षण, पोलीस काका उपक्रम तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी कार्यरत दामिनी पथकाच्या कार्यपद्धतीविषयी सविस्तर माहिती दिली. समकालीन परिस्थितीत वाढत्या सायबर गुन्हेगारीचे स्वरूप विशद करताना ऑनलाइन आर्थिक फसवणूक, बनावट सोशल मीडिया प्रोफाइल, ओटीपीची मागणी, संशयास्पद लिंक, डिजिटल ब्लॅकमेलिंग आणि मोबाईलच्या माध्यमातून घडणाऱ्या गुन्ह्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले. इंटरनेट हे ज्ञान आणि माहितीचे प्रभावी माध्यम असले तरी त्याचा अनियंत्रित व असुरक्षित वापर गंभीर परिणामांना निमंत्रण देऊ शकतो, असे नमूद करत विद्यार्थ्यांनी डिजिटल साक्षरतेसोबतच सायबर सजगताही आत्मसात करावी, असे प्रतिपादन त्यांनी केले. आपत्कालीन परिस्थितीत 112 या पोलीस हेल्पलाइन क्रमांकाचा उपयोग करण्याबाबतही मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही सामाजिक उत्तरदायित्वाची सामूहिक जाणीव ठरावी : वनमालाताई राठोड

अध्यक्षीय मनोगतात वनमालाताई राठोड यांनी विद्यार्थी सुरक्षा या विषयाकडे केवळ शैक्षणिक संस्थेच्या प्रशासकीय जबाबदारीच्या दृष्टिकोनातून न पाहता, त्याकडे व्यापक सामाजिक उत्तरदायित्व म्हणून पाहण्याची आवश्यकता अधोरेखित केली. त्या म्हणाल्या की, शिक्षणाचा खरा आशय केवळ ज्ञानार्जनापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान, विवेकशीलता, आत्मसन्मान आणि प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्याचे सामर्थ्य विकसित करणे हाही शिक्षणाचा मूलभूत हेतू आहे.

आजच्या बदलत्या सामाजिक व तंत्रज्ञानाधिष्ठित वातावरणात विद्यार्थ्यांसमोर निर्माण होणारी आव्हाने अधिक गुंतागुंतीची आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थी-पालक-शिक्षक आणि पोलीस प्रशासन यांच्यात परस्परविश्वास, संवेदनशीलता व समन्वयाची भक्कम साखळी निर्माण होणे अत्यावश्यक आहे. विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, स्वसंरक्षणाची जाणीव आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे धैर्य निर्माण झाले पाहिजे. कोणत्याही अनुचित प्रसंगाची माहिती निर्भयपणे पालक, शिक्षक अथवा पोलीस प्रशासनाला देण्याची मानसिकता विकसित होणे गरजेचे आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

तसेच तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेला प्रगतीची संधी मानताना त्याच्या गैरवापरापासून स्वतःला परावृत्त करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारली पाहिजे. डिजिटल माध्यमांचा वापर ज्ञानविस्तार, कौशल्यविकास आणि शैक्षणिक उन्नतीसाठी व्हावा; आभासी जगाच्या आकर्षणात गुरफटून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाला बाधा पोहोचवू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाने राबविलेल्या जनजागृतीपर उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे पोलीस प्रशासनाविषयी विद्यार्थ्यांमध्ये विश्वास वृद्धिंगत होण्यासोबतच सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्मितीसही हातभार लागतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रमुख अतिथी सुनीलभाऊ राठोड यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, संस्कार आणि ध्येयनिष्ठा यांचे महत्त्व विशद केले. मोबाईल व इंटरनेटच्या साधनांचा वापर ज्ञानसंपादन आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी करावा. अनावश्यक सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग आणि मनोरंजनाच्या आहारी न जाता वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर यशस्वी भविष्याची पायाभरणी करावी, असे प्रेरणादायी प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजन माध्यमिक मुख्याध्यापक श्री. जय वानखेडे व प्राथमिक मुख्याध्यापक श्री. राजू कावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भास्कर शिंदे यांनी केले, तर उपस्थित मान्यवर व सर्व उपस्थितांचे आभार श्री. विनोद राठोड सर यांनी मानले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेविषयी संस्थात्मक बांधिलकी आणि पोलीस प्रशासनाची जनहिताभिमुख भूमिका यांचा समन्वय साधणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सजगता, आत्मविश्वास आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव वृद्धिंगत करणारा ठरला.